# आदिवासींचे आर्थिक व सामाजिक प्रश्न

**प्रा. डॉ. टि. अे. मोरे**

*जिजामाता महाविद्यालय, नंदुरबार*

- **प्रस्तावना**

आदिवासी या देशाचे खरे मालक असतांना या देशाच्या समाज व्यवस्थेत त्यांचे शोषण होत आहे. त्यांच्याच वाट्याला गरीबी, दारिद्र्य, भुकबळी मोठ्या प्रमाणात आहे. दारिद्र्यात राहून किती दिवस त्यांनी इतरांच्या महालमाड्या झाडायच्या. फुकटात मतदान करून श्रीमंतांना राजकीय खुर्च्या मिळवून द्यायच्या असे अनेज प्रश्न उपस्थित होतात परंतु ते आपल्याच बोलीभाषेत, आपल्याच माणसांशी बोलतात. या समाजाचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास खूपच अल्प प्रमाणात झालेला दिसतो. भारतात आदिवासींची लोज संज्या मोठ्या प्रमाणात असतांना इतरांच्या तुलनेत त्यांचा फारशा विकास झालेला नाही. निरक्षरता, अंधश्रद्धा, पारंपारीकता, अज्ञान, दारिद्र्य, तंत्रज्ञानापासून वंचित, व्यसनाधिनता, नागरी सुविधांचा अभाव, राहजीमा-ा दर्जा खालावलेला, राजकीय उदासिनता इ. समस्यांमुळे तसेच संविधानाबाबत अपरिचितता, नकारात्मक राजकीय दृष्टीकोन भांडवलाचा अभाव, बेरोजगारी या आर्थिक समस्यांमुळे आदिवासींचा विकास होऊ शकलेला नाही. शासकीय योजनांचा या समाजाला पूर्णपणे लाभ मिळालेला नाही किंवा त्यांच्यापर्यंत पोहोचू शकलेल्या नाहीत. त्याचप्रमाणे योजना राबविल्या जात नाहीत त्यामुळे या समाजाचा आर्थिक विकास झालेला दिसत नाही.

आदिवासी्ंच्या आर्थिक जीवनात आज मोठी तफावत आहे. आदिवासी समाजाला संपूर्ण समाज व्यवस्थेचे गिऱ्हाईक बनविले जात आहे. त्यांचा औद्योगिक विकास झाला पाहिजे यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी ठोसपणे कोणत्या तरतूदी केल्या? आदिवासी जंगलात राहतात म्हणून त्यांना प्रकल्प कार्यालयामार्फत गायी, शेळ्या, मेंढ्याच द्यायच्या काय? पिढीजात हा समाज शेळ्या-मेंढ्या व गाईच पाळत आला व आपले जीवन जगणारा आदिवासी समाजातील एक गट तयार झाला. आदिवासी समाजावर लिहिणाऱ्या व बोलणाऱ्यांचा आज मोठा गट तयार झाला आहे. पण प्रत्येकाने आपल्या फायद्यापोटीच हे कार्य आरंभल्याचे दिसते. आदिवासींचा सर्वांगिण विकास झाला पाहिजे, त्यांचे जीवनमान सुधारले पाहिजे या तळमळीने कार्य करणारे फारच थोडे आहेत. फक्त हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच माणसे समाजकार्य करीत आहेत.

आदिवासींचे जीवनमान सुधरविणाऱ्या समाज सुधारकांना कोणत्याच प्रसिद्धीची व नावलौकीकाची गरज नसते. पण ज्यांनी स्वतःच्या नावापुढे समाजसेवक लावून तसा बुरखा पांघरून आदिवासींचे कार्य करण्याचे ठरविले आहे. त्यांच्या अपेक्षा फार मोठ्या आहेत. त्यात कोणाला आदिवासींना आपल्या धर्मात ओढून त्यांचे धर्मांतर करायचे आहे तर कुणाला समाजसेवेचा टेंभा मिरवून राज्य शासनाचा व केंद्र शासनाचा पुरस्कार मिळवायचा आहे. यात इतर समाजाची, धर्माची माणसे जसे फायद्यासाठी कार्य करीत आहेत त्याचप्रमाणे या क्षेत्रात आदिवासींचीच तरूण पिढी जातीच्या नावाने, देव-देवींच्या नावाने संघटना काढून, आदिवासींचा नेता म्हणून तर कधी आदिवासी पुढारी म्हणवून घेत आहेत.

- **संशोधनाची उद्दिष्ट्ये -**

➢ आदिवासी समाजाच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.

➢ आदिवासी समाजाच्या आर्थिक समस्येविषयी शासनाची भूमिका अभ्यासणे.

➢ आदिवासी समाजाच्या आर्थिक समस्यांचे निरसन करण्यासंदर्भात उपाययोजना सूचविणे.

➢ आदिवासी समाजाच्या सामाजिक समस्यांचा अभ्यासणे.

- **संशोधन पद्धती -**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम तथ्ये उपयोगात आणलेली आहेत. यात ग्रंथालयीन व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा आधार घेण्यात आलेला आहे. यात वर्तमानपत्रे, मासिके या साधनांचाही उपयोग करण्यात आलेला आहे.

- **आदिवासी समाजाच्या समस्या -**
- **आर्थिक समस्या-**

आदिवासी समाजाच्या लोकांचे पारंपारीक व्यवसाय आहेत. या व्यवसायातून विशेष उत्पन्न मिळत नाही. ते आपल्या मुलभूत गरजांची देखील पूर्तता करू शकत नाहीत. त्यामुळे ते दारिद्र्यात खितपत पडलेले आहेत. त्यांच्या आर्थिक समस्या पुढील प्रमाणे.

**१) दारिद्र्य -** आदिवासी समाजातील जास्तीत जास्त कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहेत. त्यांच्याकडे उपलब्ध असणाऱ्या उत्पन्नाची साधने अपूर्ण असल्यामुळे त्यापासून मिळणारे उत्पन्नही अल्प प्रमाणात आहेत. त्यामुळे त्यांच्या जीवनावश्यक गरजा देखील पुरेशा प्रमाणात पूर्ण होत नाहीत. वाढत्या दारिद्र्यामुळे आदिवासींचा विकास योग्य रितीने होऊ शकत नाही.

**२) बेरोजगारी -** आदिवासी समाजामध्ये बेरोजगारी एक मोठी समस्या आहे. त्यामुळे नक्षलग्रस्त भागातील तरुण नक्षलवादाकडे आकर्षित होण्याचे प्रमाण वाढलेले आहे. रोजगाराअभावी आदिवासींचा आर्थिक विकास योग्य गतीने होत नाही.

**३) भांडवलाचा अभाव -** आदिवासी समाजामधील ज्या व्यक्ती लघुउद्योग सुरु करू इच्छितात किंवा असे उद्योग चालविण्याची क्षमता आहे त्यांच्याकडे भांडवलाचा अभाव असल्यामुळे आर्थिक विकासात अडथळे निर्माज झालेले आहेत.

**४) पारंपारीज व्यवसाय -** आदिवासी समाजामधील बहुतेक व्यवसाय पारंपारीक आहेत. उदा. लाकुडतोड, पशूपालन, मद्यनिर्मिती, शिकार, शेतमजूरी इ. व्यवसायातून त्यांना अत्यल्प उत्पन्न मिळते. जास्त श्रम आणि कमी मोबदला मिळत असल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती खालावलेली आहे. अत्यल्प उत्पन्नामुळे त्यांचा आर्थिक विकास झालेला नाही.

**५) कर्जबाजारीपणा -** दारिद्र्यामुळे आदिवासी लोकांना आपल्या गरजा भागविण्यासाठी खाजगी सावकारांकडून जास्त व्याजदराने कर्ज घेणे भाग पडते. कर्जफेडीसाठी त्यांना सावकारांकडे आपली शेती

जहाण ठेवावी लागते. अनेकदा त्यांना कर्जफेडीसाठी आपल्याच शेतीवर सक्तीने काम करणे भाग पडते व याच्यातून कर्जबाजारी होत जातात.

**६) स्थलांतरीत शेतीची समस्या -** बहुतांश डोंगर-दऱ्यातील आदिवासी लोक एकाच ठिकाणी स्थायी शेती करीत नसून ते दोन-तीन वर्षानंतर शेतीची सुपिकता कमी होत असल्याचा समज असल्याने शेतीचे स्था-ा बदलतात. व जंगलातील झाडे-झुडुपे कापून शेती करतात. या पद्धतीमुळे जंगल संपत्तीही नष्ट झाली आहे.

**७) औद्योगिकीकरणातून शोषण -** आदिवासी क्षेत्रात चहा, कॉफीचे मळे, विविध खाणीतून नवीन उद्योगधंदे विकसित झाले. पण या औद्योगिकरणाने अकुशल, असंघटीत, अज्ञानी आदिवासींचे शोषणच झालेले आहे. अकुशल कामगार अशी कामे त्यांना करावी लागतात व त्यांची आर्थिक पिळवणूक केली जाते. म्हणजेच औद्योगिकीकरणाने आदिवासींचे जीवन समृद्ध झाले नाहीच. उलट त्यांचे शोषणच होत आहे.

- **सामाजिक समस्या -**

**१) व्यसनाधिनता -** आदिवासी समाजातील बहुतांशी लोकसंख्या पारंपारीक व्यवसायात गुंतलेली आहेत. त्यात मध्यनिर्मिती त्यांचा पारंपारीक व्यवसाय आहे. अज्ञान, आरोग्य जागृतीचा अभाव यामुळे आदिवासी व्यसनाधिनतेकडे वळतात. त्यामुळे त्यांचा अपेक्षित सामाजिक विकास होऊ शकलेला नाही.

**२) अंधश्रद्धा व जुन्या पद्धती -** आदिवासींची संस्कृती प्राचीन संस्कृती म्हणून ओळखली जाते. पारंपारीकता हा त्यांचा जीवनशैलीचा घटक आहे. आधुनिक काळात देखील आदिवासी समाज पारंपारीकतेशी चिकटून आहेत. उदा. जादू-टोणा, अंगारे-धुपारे, ताईत, चेटकीन इ. प्रकारच्या अंधश्रद्धा आदिवासी पाळतात. अंधश्रद्धेच्या मानसिकतेत अडकलेली असल्यामुळे त्यांचा सामाजिक विकास खुंटलेला आहे.

**३) निरक्षरता व अज्ञा-ा -** आदिवासी समाजामध्ये शिक्षणाचे अल्प प्रमाण आहे. परिणामी शासनाने त्यांच्यासाठी विविध योजना पूर्णपणे व खऱ्या अर्थाने त्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत. निरक्षरतेमुळे आदिवासींचा सामाजिक विकास होऊ शकलेला नाही.

**४) नागरी सुविधांपासून वंचित -** भारतातील बहुतांश आदिवासी भागात पिण्याचे स्वच्छ पाणी, आरोग्य सुविधा, शौचालये, सुरक्षित रस्ते इ. पायाभूत नागरी सुविधांचा अभाव असल्यामुळे त्यांच्यात सामाजिक विकासात अडथळे निर्माण होत आहेत.

**५) कुटुंबाचा आकार -** आदिवासी समाजातील पारंपारीक गर्तेत अडकलेली समाज व्यवस्था, कुटुंब नियोजनासंबंधी अपेक्षित जागृती न झाल्यामुळे कुटुंबाची संख्या वाढत चालली आहे. परिणामी कुटुंबातील सर्वच पाल्यांच्या मुलभूत गरजा व्यवस्थितपणे पूर्ण होऊ शकत नाहीत. परिणामतः एकूणच त्यांच्या विकासात अडथळे निर्माण होतात.

**६) राहणीमानाचा निम्न स्तर -** भारतातील प्रगत समाजाशी आदिवासींची तुलना केल्यास ही बाब स्पष्ट होते की, त्यांचा जीवनमानाचा दर्जा खालावलेला आहे. निकृष्ठ दर्जाचा आहार, कुपोषण, पारंपारीकता, निरक्षरता, उत्पन्नाची अपुरी साधने इ. कारणांमुळे त्यांच्या जीवनावश्यक गरजा देखील पूर्ण होऊ शकत नाहीत. परिणामी त्यांच्या सामाजिक विकासात अडथळे निर्माण झालेले आहेत.

- **उपाययोजना -**

आदिवासींना सक्षमीकरण करण्याकरीता पुढील उपाय आवश्यक वाटतात.

➢ आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासासाठी असणाऱ्या विविध शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजवणी करणे.

➢ आदिवासींना राजकीय हक्कांची जाणिव करून देण्यासाठी शासकीय स्तरावर जनजागृती करणे.

➢ आदिवासींच्या विकासासाठी व्यसनमुक्तीपर मोठ्या प्रमाणात जनजागृती कार्यक्रमांची आखणी करणे.

➢ आदिवासी समाजातील मुला-मुलींना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहीत करणे.

➢ आदिवासी समाजामध्ये सामाजिकदृष्ट्या जनजागृती करणे.

➢ आदिवासींना स्थानिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावणे.

➢ आदिवासी समाजाची अंधश्रद्धा, परंपरागत रुढी, दैववाद यांच्यापासून मुक्तता करण्यासाठी जनजागृती अभियान राबविणे.

➢ आदिवासींच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी शासकीय व सामाजिक स्तरावर सकारात्मक व ठोस उपाययोजना करून पूर्णपणे अंमलात आणण्याची आवश्यकता आहे.

- **निष्कर्ष -**

➢ शासनाने आदिवासींच्या आर्थिक विकासासाठी केलेल्या उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होतांना दिसत नाही. त्यामुळे आदिवासींची आर्थिक समस्या कायम आहे.

➢ घटनात्मक तरतूदी असल्या तरी आदिवासींचा आर्थिक, सामाजिक व राजकीय विकास फारसा झालेला नाही.

➢ आदिवासींच्या विकासासाठी शासनाने अनेक योजना सुरु केलेल्या आहेत. परंतु त्यातील बहुतांश कागदोपत्रीच आहेत.

➢ आदिवासींमध्ये अज्ञान व निरक्षरतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे.

➢ आदिवासींची व्यसनाधिनता कमी झालेली दिसत नाही.

➢ आदिवासींमध्ये अज्ञान, मागासलेपणा, दारिद्र्य, बेरोजगारी, अल्प वेतन यामुळे आर्थिक विकास झालेला नाही.

➢ मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज नागरी वस्तीपासून दूर असल्यान, डोंगर, दऱ्या-खोऱ्यात वास्तव्यास असल्याने विकासापासून लांब आहे.

➢ विविध प्रकारच्या विकासात्मक योजनांची माहिती या समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी शासन-प्रशासन प्रभावीपणे प्रयत्न करतांना दिसत नाही. म्हणून ठराविक आदिवासींचा विकास झालेला दिसतो.

**संदर्भ :-**

**१)** लोकराज्य मासिक, ऑगस्ट-सप्टेंबर २०१३

**२)** जोविंद जारे - भारतीय आदिवासी, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे १९७९

**३)** डॉ. एस.जी. देवगावकर - सामाजिक चळवळी व परंपरा, श्रीसाई प्रज ाश-ा, -ााजपूर-१०

**४)** अर्थसंवाद - अंक ३, ऑक्टोबर--ोव्हेंबर २०१२

**५)** दै. सम्राट - मे २०१२

**६)** महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, माहिती पुस्तिका २०११-१२